संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com





● वर्ष : ७ वे ● ● अंक : ६७ वा ● ● शुक्रवार दि. ६ ऑक्टोबर २०२३ ● ● किंमत २ रू ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# नांदेड व घाटी रूग्णालयातील मृत्यूप्रकरणी चौकशी समिती

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालये, महापालिका व नगरपालिकांची रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, वैद्यकीय महाविद्यालयाच्या अखत्यारितील रुग्णालयांना तात्काळ भेट देऊन पाहणी करावी आणि सद्यस्थितीचा अहवाल सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. नवी दिल्लीतून मुख्यमंत्री शिंदे यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधून राज्यातील आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. यापुढे जिल्हाधिकाऱ्यांनी नियमितपणे शासकीय रुग्णालयांना भेटी देण्याच्या स्पष्ट सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. नवी दिल्ली येथून दूरदृश्यप्रणालीद्वारे घेतलेल्या या बैठकीला मुख्य सचिव मनोज सौनिक, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे यांचेसह आरोग्य, वैद्यकीय शिक्षण विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि राज्यातील सर्व जिल्हाधिकारी उपस्थित होते. नांदेड आणि घाटी येथील रुग्णालयांमध्ये झालेल्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्यस्तरीय समिती नेमण्यात आली आहे. दोषींवर



**नवी दिल्ली : येथून राज्यातील आरोग्य यंत्रणेचा आढावा घेताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

कडक कारवाई केली जाईल. एकूण औषध असून जिल्हाधिकाऱ्यांनाही अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे औषध खरेदीत विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्य सरकारचे आरोग्य व्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य आहे. आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन आराखडा तयार करण्याचे काम राज्य सरकार करत असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही. यापुढे जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेची जबाबदारी ही आपली मानून दररोज जिल्ह्यातील वेगवेगळ्या सरकारी रुग्णालयांना भेट देऊन सातत्याने आढावा घ्यावा आणि तातडीने योग्य ती पावले उचलावीत, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

पान नं. २ वर

# लिंगीवरेत वानरांचा सुळसुळाट

### शेळ्या–मेंढ्यांची १० ते १५ पिल्ले मारली : वन खात्याचे दुर्लक्ष

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील लिंगीवरे गावात वानरांचा सुळसुळाट झाला आहे. वानरांच्या टोळीची चांगलीच दहशत गावावर बसली असून आतापर्यंत वानरांच्या हल्यात १० ते १५ शेळी व मेंढ्याची पिल्ली मारली गेली आहेत. त्यामुळे गावातील नागरिक भयभयीत झाले आहेत.

लिंगीवरेचे माजी सरपंच विराज पुजारी यांनी याबाबत वनविभागाच्या अधिकाऱ्यांना वारंवार सूचना देवूनही वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले आहे. वन विभागाच्या या भोंगळ कारभारावर लिंगीवरेतील नागरिकांनी नाराजी व्यक्त केली असून जर वानरांच्या टोळीने एखाद्या बालकावर हल्ला करून त्यास जखमी केल्यास त्याला सर्वस्वी वन विभाग जबाबदार असल्याचे विराज पुजारी म्हणाले.

लिंगीवरेतील सुरेश खांडेकर, परमेश्वर खटके, राहुल खटके, अक्षय माडकर, बबन गुरव, सोमनाथ मदने, शहाजी खटके, मधुकर खटके, आगतराव खांडेकर, भाऊ चोरमले, किसन जावीर या शेतकऱ्यांची शेळी–मेंढीची पिल्ले वानरांच्या टोळीने हल्ला केल्याने यामध्ये मृत्युमुखी पडले असून याची नुकसान भरपाई वनविभागाने द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

# घरफोडी करणाऱ्या तरुणास अटक, १८ लाखाचा ऐवज हस्तगत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** कर्नाटकातील कारागृहातून जामीनवर बाहेर आल्यानंतर सांगलीसह रत्नागिरी, कोल्हापूर जिल्ह्यात घरफोड्या करणाऱ्या पंढरपूरच्या तरुणास सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने अटक केली. त्याच्याकडून चोरीतील १ लाख ६० हजाराच्या रोकडसह सोन्या–चांदीचे दागिने असा १८ लाखाचा ऐवज हस्तगत करण्यात आल्याची माहिती निरीक्षक सतीश शिंदे यांनी गुरुवारी दिली.




**सांगली : घरफोडी करणाऱ्या अट्टल चोरट्यास सांगली पोलिसांनी अटक केली. यावेळी तपास करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी**

तासगाव, इस्लामपूर, आष्टा, शाहूपुरी कोल्हापूर आणि दापोली आदी ठिकाणी बंद घरे फोडून ऐवज लंपास करण्यात आला होता. संशयित लखन कुलकर्णी उर्फ सचिन माने (वय ३०, रा. अनिलनगर, पंढरपूर) हा सांगलीत आल्याची माहिती मिळाली. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांने घरफोड्यांची कबुली दिली. त्याच्याकडून ३० तोळे सोन्याचे व १५१ ग्रॅम चांदीचे दागिने आणि १ लाख ६० हजार रोख असा सुमारे १८ लाखाचा ऐवज हस्तगत करण्यात आले असून न्यायालयाने चार दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे न्यायालयाने दिले आहेत.

# रूग्णांवरील उपचारांमध्ये हयगय व दिरंगाई करणाऱ्यांवर कडक कारवाई

### जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी : आरोग्य व्यवस्थेच्या आढावा बैठकीत स्पष्ट निर्देश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयात उपचारांसाठी येणाऱ्या रूग्णांवर तातडीने औषध उपचार करावेत. या रूग्णांच्या उपचारांमध्ये कोणतीही हेळसांड व हयगय होऊ नये, याची दक्षता आरोग्य यंत्रणेने घ्यावी. रूग्णांवरील उपचारांमध्ये हयगय व दिरंगाई करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिले.

पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील सर्वोपचार रुग्णालयास प्रत्यक्ष भेट व आरोग्य व्यवस्थेच्या आढावा बैठकीत



**सांगली : जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील सर्वोपचार रुग्णालयास प्रत्यक्ष भेट व आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेतला.**

ते बोलत होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. सुधीर नणंदकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम यांच्यासह रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. जनतेला चांगल्या व दर्जेदार आरोग्य सुविधा देण्यासाठी शासनामार्फत अनेक सोई सुविधांबरोबरच आवश्यक यंत्र सामग्री व निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी रुग्णालयातील औषध भांडारास भेट देऊन उपलब्ध औषध साठ्याची माहिती घेतली. रुग्णालयात पुरेसा औषध साठा असावा याची दक्षता घेण्याची सूचना करून आवश्यक औषधांची

पान नं. २ वर

# ग्रामपंचायत निवडणूकीसाठी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करा : राजीव शिंदे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** जिल्ह्यातील ९४ ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक तसेच २६ ग्रामपंचायतीतील २९ रिक्त जागांकरिता व ३ थेट सरपंच पोट निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून निकाल जाहीर होईपर्यंत सदर ग्रामपंचायतीमध्ये आचार संहिता लागू राहील. सदर आचारसंहिता केवळ संबंधित ग्रामपंचायत व त्याच्या सीमेलगतच्या गावामध्ये लागू राहील. तरी सांगली जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करून, कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता निवडणूक प्रकिया शांततेत पार पाडण्यात यावी, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (महसूल) राजीव शिंदे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

पत्रकात म्हटले आहे, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील दि. ३ ऑक्टोबर २०२३ च्या आदेशान्वये माहे जानेवारी ते डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती, नव्याने स्थापित व सन २०२२ मध्ये चुकीची प्रभागरचना झाल्यामुळे निवडणुका न होऊ शकलेल्या ग्रामपंचायतींच्या (सदस्य पदासह थेट सरपंच पदाच्या) सार्वत्रिक निवडणुकांसाठी संगणक प्रणालीव्दारे तसेच ग्रामपंचायतीतील रिक्त जागांच्या पोट निवडणुकांसाठी पारंपरिक पद्धतीने राबविण्याचा प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील एकूण ग्रामपंचायतीच्या टक्केवारीच्या प्रमाणात सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतीची संख्या ही ५० टक्केपेक्षा कमी असल्याने संपूर्ण जिल्ह्यामध्ये तसेच कोणत्याही तालुक्यामध्ये संपूर्ण आचारसंहिता लागू राहणार नाही. केवळ संबंधित ग्रामपंचायत व त्याच्या सीमेलगतच्या गावामध्ये आचारसंहिता लागू राहील. सदरची आचारसंहिता ही संपूर्ण जिल्ह्यामध्ये वा तालुक्यामध्ये व नागरी स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये लागू नसली, तरी ग्रामपंचायतीच्या मतदारावर प्रभाव पडेल, अशा प्रकारची कोणतीही कृती / भाष्य नागरी क्षेत्रात करता येणार नाही. सदर निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत पोलीस अधीक्षक सांगली व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना मा. निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहे. तरी सांगली जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करून कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता निवडणूक प्रकिया शांततेत पार पाडण्यात यावी, असे आवाहन पत्रकात करण्यात आले आहे.

# जांभूळणीत शेतजमिनीच्या कारणावरून परस्परांना मारहाण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील जांभूळणी येथे शेतजमिनीच्या वादातून परस्परांना मारहाण करण्यात आली असून याप्रकरणी परस्परविरोधी आटपाडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी नितीन मुरलीधर पाटील हे रिक्षाने जांभूळणी येथे जात असताना त्यांना जमिनीचे वाटपाचे व कब्ज्याचे कारणावरून वाद उकरून काढून फिर्यादीची आई अंजूबाई मुरलीधार पाटील व भाऊ रामचंद्र मुरलीधर पाटील यांना आरोपी अंकुश शिवाजी पाटील, बंडोपंत शिवाजी पाटील, कलावती शिवाजी पाटील, शिवाजी सुखदेव पाटील यांनी मारहाण करून जखमी केले.

फिर्यादी अंकुश शिवाजी पाटील हे शेतामध्ये जनावरांना वैरण आणण्यासाठी जात असताना, आरोपी नवनाथ मुरलीधर पाटील, नितीन मुरलीधर पाटील, अंजूबाई मुरलीधर पाटील, रामचंद्र मुरलीधर पाटील यांनी फिर्यादीला मारहाण केली असल्याची फिर्यादी दाखल केली आहे.

# आटपाडीत स्वाभिमानी वंचित बहुजन आघाडीची स्थापना

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडीत 'स्वाभिमानी वंचित बहुजन आघाडी' या या नवीन पक्ष संघटनेची स्थापना करण्यात आली. स्वाभिमानी वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष म्हणून दलित बहुजन चळवळीचे ज्येष्ठ नेते अरुण वाघमारे यांचे निवड करण्यात आली व आटपाडी तालुका अध्यक्ष म्हणून ताजुद्दीन झारी यांची निवड करण्यात आली.



**आटपाडी : येथे स्वाभिमानी वंचित बहुजन आघाडीची स्थापना अरुण वाघमारे यांच्या उपस्थित करण्यात आली. यावेळी बैठकीस उपस्थित मान्यवर**

निवढी नंतर– स्वाभिमानी वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अरुण वाघमारे बोलताना म्हणाले, स्वाभिमानी वंचित बहुजन आघाडी ही फुले शाहू आंबेडकर या विचारधारेवर काम करेल व समाजातील वंचित बहुजनांचा आधार बनवून त्यांना स्वाभिमानाने लढण्यासाठी सत्तेपासून वंचित असणाऱ्या घटकांना स्वाभिमानाने सत्तेत आणण्यासाठी सत्तेचा वाटा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करेन. स्वाभिमानी वंचित बहुजन आघाडी ही संघटना महाराष्ट्रभर महाराष्ट्र पोचवण्याचे काम करेल. महाराष्ट्रातून जिल्हा अध्यक्ष यांच्या निवडी व राज्यातील पदाधिकारी यांच्या निवडी ही लवकर जाहीर केल्या जातील.

स्वाभिमानी वंचित बहुजन आघाडी मध्ये सर्व जाती–धर्माच्या लोकांचा समावेश असेल व सर्वांना समान न्याय देण्याचा प्रयत्न करेन असे प्रतिपादन ताजुद्दीन झारी यांनी निवड नंतर बोलताना सांगितले. तसेच आटपाडी तालुक्यात व सांगली जिल्ह्यात फुले शाहू आंबेडकर विचार रुजवण्याचे काम अरुण वाघमारे यांनीच केले असून आटपाडी तालुक्यातील वंचित समाजांना स्वाभिमानी वंचित बहुजन आघाडी मध्ये सामावून न्याय मिळवून देण्याचे काम करीन व हा पक्ष संघटना वाढण्यासाठी काम करीन असे म्हणाले.

या बैठकीचे स्वागत व प्रस्तावना करताना सनी कदम म्हणाले, आटपाडी तालुक्यातील येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सर्व निवडणुका स्वाभिमानी वंचित बहुजन आघाडी स्वबळावर लढेल. बैठकीचे आभार साहेबराव वाघमारे यांनी मानले. यावेळी बैठकीस अमित वाघमारे, दादासाहेब कदम, अण्णासाहेब भोरे, महेश मोटे, राहुल मोटे, योगेश मोटे, धनाजी ऐवळे, ईश्वर ऐवळे, सचिन हेगडे, नितीन वाघमारे तसेच इतर कार्यकर्ते उपस्थित होते.






# संपादकिय

## क्रिकेटचा महाकुंभमेळा सुरु

इंग्लंड हे क्रिकेटचे माहेरघर आहे आणि इंग्रजांनीच आपल्याला क्रिकेट या खेळाची अमूल्य अशी भेट दिली आहे. परंतु याच इंग्लंडला सलामीचा लढतीत न्युझीलंड कडून पराभव स्वीकारावा लागला अन या क्रिकेट च्या महाकुंभ मेळाव्याला सुरुवात झाली. क्रिकेट चे गारुड हे मोठ-मोठ्या शहरांबरोबरच गाव-खेड्यांमध्येही पाहायला मिळते. अशा जळी - स्थळी क्रिकेट सामन्यांच्या स्पर्धा भरवून त्यात रममाण होणाऱ्या आणि आता क्रिकेटचे मुख्य केंद्र बनलेल्या भारतात क्रिकेटच्या महाकुंभमेळ्याला म्हणजेच एकदिवसीय विश्वचषकाला सुरुवात झाली.

ट्वेन्टी-२० क्रिकेटची वाढती लोकप्रियता, गेल्या काही काळात कसोटी क्रिकेटला लाभलेली नवसंजीवनी यामुळे एकदिवसीय क्रिकेटचे महत्त्व कमी होत असल्याची भीती आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद, आजी-माजी खेळाडू आणि काही चाहत्यांमध्ये व्यक्त होत होती. अशा वेळी क्रिकेटवेड्या भारतात विश्वचषक स्पर्धा आयोजित होणे, हे एकदिवसीय क्रिकेटच्या भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरू शकेल. आशियाई क्रीडा स्पर्धांमध्येही भारताचा दबदबा वाढत असतानाच व या स्पर्धा ऐन रंगात आलेल्या असतानाच देशात एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा होत आहेत. अशा विविध स्पर्धांची रेलचेल सुरू असल्याने यंदा विश्वचषक स्पर्धेबाबत तितकीशी चर्चा झालेली नव्हती. त्यामुळे विश्वचषकासाठीचा माहोल म्हणावा तसा तयार झालेला नाही. मात्र भारतामध्ये क्रिकेट स्पर्धेबाबत चर्चा होण्यासाठी एखादा सामनाही पुरेसा ठरतो. त्यामुळे अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गतविजेता इंग्लंड आणि उपविजेत्या न्यूझीलंड या तुल्यबळ संघांतील पहिला सामना अपेक्षेप्रमाणे चुरशीचा झाला, तर विश्वचषकाबाबत चाहत्यांमध्ये असलेली उत्सुकता निश्चित वाढेल, हे निश्चित.

२०११ नंतर प्रथमच भारतात एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. त्यावेळी भारताने सह-यजमानपद भूषवतानाच विश्वचषकाचे जेतेपद मिळवले होते. मात्र, त्यानंतरच्या १२ वर्षांत भारताला 'आयसीसी'ची केवळ एक (२०१३मध्ये चॅम्पियन्स करंडक) जागतिक स्पर्धा जिंकता आली आहे. २०११ मध्ये भारतीय संघ विजयी ठरल्यानंतर २०१५ मध्ये ऑस्ट्रेलिया आणि २०१९ मध्ये इंग्लंडने मायदेशात एकदिवसीय विश्वचषकाचे जेतेपद मिळवले होते. आता यजमान भारताचा संघही या स्पर्धेवर वर्चस्व गाजवणार का आणि गेल्या दशकभरापासूनचा जागतिक जेतेपदाचा दुष्काळ संपवणार का, हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरणार आहे. गेल्या २०१९च्या स्पर्धेप्रमाणे यंदाच्या विश्वचषकातही १० संघांचा समावेश असून सर्व संघ एकमेकांविरुद्ध साखळी सामने खेळणार आहेत. साखळी सामन्याअंती गुणतालिकेत अव्वल चार स्थानांवर असणारे संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. त्यानंतर अंतिम सामनाही अहमदाबाद येथे १९ नोव्हेंबरला खेळवला जाणार आहे. मात्र, त्यापूर्वीच्या सामन्यांत सर्वच संघांमध्ये चुरस असेल हे निश्चित.




# विधानपरिषदेच्या शतक महोत्सवानिमित्त आजी-माजी सदस्यांचा स्नेहमेळावा आणि परिसंवाद

**मुंबई :** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त विद्यमान आणि विधानपरिषदेच्या माजी सदस्यांसाठी परिसंवाद आणि स्नेहमेळावा लवकरच आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली विधानपरिषदेतील गटनेते आणि सदस्यांची आज बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री तसेच अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत या परिसंवाद आणि स्नेहमेळाव्याचे उद्घाटन सत्र व्हावे, असे निश्चित करण्यात आले.



या बैठकीत विधानपरिषद शतक महोत्सवानिमित्त प्रकाशित करावयाच्या संदर्भसमृद्ध ग्रंथांच्या कामाचा आढावा देखील घेण्यात आला. विधानपरिषद या दुसऱ्या सभागृहाचे महत्त्व आणि वैशिष्ट्य, गत १०० वर्षातील महत्वपूर्ण विधेयके, ठराव, विधानपरिषदेमध्ये लोकहिताच्या महत्वाच्या प्रश्नांवर, विषयांवर झालेल्या चर्चा, शंभर वर्षे शंभर भाषणे आणि छायाचित्रांचे संकलन असलेले कॉफी टेबल बुक अशी पाच प्रकाशने प्रस्तावित असून त्यात कोणकोणते महत्वाचे संदर्भ समाविष्ट करण्यात यावेत यावर उपस्थित मान्यवरांनी महत्वपूर्ण सूचना या बैठकीत केल्या.

प्रस्तावित प्रकाशने आणि परिसंवाद यासंदर्भात ज्येष्ठ विद्यमान आणि माजी सदस्य, ज्येष्ठ पत्रकार, राजकीय अभ्यासकांना काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी लेखी स्वरूपात आपले मत विधानमंडळाकडे अवश्य कळवावे, असे आवाहन विधानपरिषद उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी केले आहे. हा परिसंवाद आणि स्नेहमेळावा सर्वांनी मिळून यशस्वी करावा आणि ज्येष्ठांचे सभागृह असा लौकिक प्राप्त झालेल्या विधानपरिषदेच्या शतक महोत्सव सुवर्णक्षणांचे साक्षीदार व्हावे, असे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी म्हटले आहे.

याबैठकीस माजी मंत्री ड. अनिल परब, सदस्य कपिल पाटील, सत्यजित तांबे, विधानमंडळ सचिवालयाचे सचिव २ विलास आठवले, उपसभापती यांचे खासगी सचिव रवींद्र खेबुडकर, विशेष कार्य अधिकारी अविनाश रणखांब, विधिमंडळाचे जनसंपर्क अधिकारी नीलेश मदाने, ग्रंथपाल आणि उपग्रंथपाल अनुक्रमे नीलेश वडनेरकर आणि शत्रुघ्न मुळे उपस्थित होते.

# महा-आरोग्य शिबीराचे कोल्हापूर येथे आयोजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** धर्मादाय सह आयुक्त कार्यालय कोल्हापूर विभाग, कोल्हापूर रिजन ट्रस्ट प्रॉक्टिशनर बार असोसिएशन व कोल्हापूर विभागातील सर्व धर्मादाय रुग्णालये यांच्या संयुक्त विद्यमाने धर्मादाय संघटनेतर्फे रविवार, दिनांक ८ ऑक्टोबर २०२३ रोजी, ताराराणी विद्यापीठ व्ही.टी. पाटील हॉल, राजाराम रोड येथे सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत सर्व रोग निदान महा-आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले असल्याची माहिती धर्मादाय उपआयुक्त डॉ. मनिष पवार यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली आहे. या शिबीरामध्ये नेत्ररोग, दंतविकार, त्वचारोग, न्युरो, एचआयव्ही, हृदयरोग, स्त्रीरोग, कॅन्सर, कान नाक घसा, ऑर्थोपेडिक, किडनी, होमिओपॅथिक, आयुर्वेदिक विभाग आदी सेवा मोफत उपलब्ध होणार आहेत. शिबीरामध्ये कोल्हपूर शहर आणि जिल्ह्यातील १८ हॉस्पिटल, सांगली २२ हॉस्पिटल, रत्नागिरी ५ हॉस्पिटल व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील ३ हॉस्पिटल सहभागी होणार आहेत. कोल्हापूर, रत्नागिरी, सांगली येथील आणि सिंधुदूर्ग येथील सर्व धर्मादाय रुग्णालयांचे पथक शिबीरात आरोग्य तपासणी करणार आहेत.

शिबीराचा उद्देश हा कोल्हापूर, रत्नागिरी, सांगली येथील आणि सिंधुदूर्ग येथील गरीब व दुर्बल घटकातील लोकांनी महागड्या उपचारांकरिता मुंबई, पुणे सारख्या शहरात दूर न जाता कोल्हापूर विभागातील सर्व धर्मादाय रुग्णालयांमध्येच विविध प्रकारच्या रुग्ण सेवा उपलब्ध करुन देणे हा आहे. तसेच सर्वसामान्य लोकांना कोल्हापूर विभागातील सर्व धर्मादाय रुग्णालयांबद्दल व त्यांच्या रुग्णसेवेबद्दल एकाच छताखाली माहिती पुरविणे हा आहे. या सर्व रोगनिदान महा-आरोग्य शिबीराचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन धर्मादाय सहआयुक्त कोल्हापूर विभागातर्फे करण्यात आले आहे.

# १६५ कोटी रुपयांच्या बनावट विक्री बिलांच्या प्रकरणी दोन जणांना अटक

**मुंबई :** महाराष्ट्र वस्तू व सेवाकर विभागाने १६५.७८ कोटी रुपयांच्या बनावट विक्री बिलांच्या आधारे बोगस इनपुट टॅक्स क्रेडिट (खढउ) संदर्भात शासनाची २७.७४ कोटी रुपयांच्या कर महसुलाची हानी करणाऱ्या दोन व्यक्तींना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती मुंबईच्या राज्यकर सहआयुक्त (अन्वेषण- अ) प्रेरणा देशभ्रतार यांच्यावतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये देण्यात आली आहे.

मे. श्री समस्ता ट्रेडिंग प्रा. लि. व शरद क्लिअरिंग ण्ड फॉरवर्डिंग प्रा. लि. या व्यापाऱ्यांच्या विरोधात राज्य शासनाच्या वस्तू व सेवाकर विभागाकडून कर चोरी विरोधी विशेष अन्वेषण कारवाई सुरू करण्यात आली होती. या कारवाईदरम्यान बनावट कंपन्यांची स्थापना करून बोगस बिल देण्याचे काम सुरू असल्याचे निदर्शनास आले. यासंदर्भात वस्तू व सेवाकर विभागाकडून बोगस बिलासंदर्भात मोहीम राबवीत प्रमुख सूत्रधार राहुल अरविंद व्यास व विकी अशोक कंसारा यांना ४ ऑक्टोबर २०२३ रोजी अटक करण्यात आली. त्यांना महानगर दंडाधिकाऱ्यांनी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

सर्व समावेशक नेटवर्क विश्लेषण साधनांचा वापर करून आणि इतर विभागांशी समन्वय साधून महाराष्ट्र वस्तू व सेवाकर विभाग कर चुकविणाऱ्या व्यापाऱ्यांचा शोध घेत आहे. बोगस व्यापार करून कर चुकवेगिरी करणाऱ्या व्यापाऱ्यांमुळे बाजारपेठेतील स्पर्धा नष्ट होऊन योग्य व्यवसाय करू इच्छिणाऱ्या व्यापाऱ्यांना नुकसान सहन करावे लागत आहे. मात्र, या दोन जणांच्या अटकेतून महाराष्ट्र वस्तू व सेवाकर विभागाने कर चुकवेगिरी करणाऱ्यांना इशारा दिला आहे, असेही प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.







# नांदेड व घाटी रूग्णालयातील मृत्यूप्रकरणी चौकशी समिती

**पान नं. १ वरुन :** विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, रुग्णालयांचे अधिष्ठाता आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांनी एक टीम म्हणून आरोग्ययंत्रणेचे काम करावे. आवश्यक निधी आणि अतिरिक्त साधनसामुग्रीची मागणी आल्यास ती तात्काळ पुरविण्यात यावी. मनुष्यबळ कमी असल्यास आउटसोर्सिंग करण्याचे अधिकारही जिल्हास्तरावर देण्यात आलेले आहेत. त्यामुळे राज्यातील जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा देण्याच्या शासनाच्या प्रयत्नांना साधनसामुग्री, मनुष्यबळा अभावी विलंब झाल्यास संबंधितांना जबाबदार धरून कारवाई करण्यात येईल आणि औषधे, मनुष्यबळाची कमतरता ही कारणे खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशारही मुख्यमंत्र्यांनी दिला.

# रूग्णांवरील उपचारांमध्ये हयगय व दिरंगाई करणाऱ्यांवर कडक कारवाई

**पान नं. १ वरुन :** मागणी वेळीच करावी. त्यामुळे औषध खरेदीत विलंब होणार नाही. यासाठी तात्काळ निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी सांगितले. साधनसामुग्री, मनुष्यबळाअभावी रूग्णांच्या उपचारात विलंब झाल्यास संबंधितांना जबाबदार धरून कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी या भेटी प्रसंगी सांगितले. शासकीय रुग्णालयांची नियमित स्वच्छता ठेवावी. त्याची दररोज एका अधिकाऱ्यामार्फत स्वच्छतेची तपासणी करावी, असे सूचित करून डॉ. राजा दयानिधी म्हणाले, आवश्यकतेनुसार चतुर्थ श्रेणी कर्मचारी भरतीबाबत कार्यवाही करून रीतसर प्रस्ताव सादर करावा. तसेच गरजेनुरूप करार तत्वावरील कर्मचाऱ्यांची आउट सोर्सिंग द्वारे सेवा घ्यावी, असे त्यांनी सूचित केले. तसेच सर्व शासकीय रुग्णालयांचे फायर आणि इलेक्ट्रिकल ऑडिट करून घ्यावे. आवश्यक तेथे दुरुस्तीचा प्रस्ताव पाठवावा, अशाही सूचना त्यांनी दिल्या. दरम्यान, डॉ. राजा दयानिधी यांनी रुग्णांच्या नातेवाईकांशी संवाद साधला. संबंधित नातेवाईकांनी दिलेल्या सूचना, सुधारणाबाबतचे मत विचारात घेऊन कार्यवाही करावी, असे सांगून त्यांनी आजच्या बैठकीत दिलेल्या सूचनाचे पालन होते की नाही, याची तपासणी करण्यासाठी वेळोवेळी शासकीय रुग्णालयाना भेटी देणार असल्याचे सांगितले.




दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






# गट-क संवर्गातील पदांसाठी सरळसेवा भरतीसाठी परीक्षा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** सांगली जिल्ह्यात ७, ८, १० व ११ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत जिल्हा परिषद सांगली कडील गट-क संवर्गातील ७५४ पदांसाठी सरळसेवा भरती परीक्षा सन-२०२३ जिल्ह्यातील दोन परीक्षा केंद्रावर सकाळी ६ ते सायंकाळी ८ या वेळेत घेण्यात येणार आहे. परीक्षा केंद्राच्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी परीक्षा केंद्राच्या ठिकाणी इमारतीपासून १०० मीटर सभोवतालच्या परिसरात परीक्षा कालावधीत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ लागू केले असल्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

आदेशात म्हटले आहे, परीक्षा वेळेत परीक्षेसंबंधी अधिकारी / कर्मचारी व परीक्षेस येणारे विद्यार्थी तसेच त्यांचे लेखनिक वगळता इतर कोणत्याही चार किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना परीक्षा केंद्राच्या ठिकाणी फिरण्यास, एकत्रित गटागटाने फिरणे व उभा राहण्यास मनाई केली आहे. तसेच परिक्षा केंद्राच्या परिसरातील झेरॉक्स मशिन, पब्लिक टेलिफोन बुथ, फॅक्स मशिन, ध्वनीक्षेपक यांचा परिक्षा संदर्भात कोणत्याही गैरप्रकारासाठी वापरण्यास मनाई केली असून परिक्षा केंद्रात विद्यार्थी तसेच त्यांचे लेखनिक यांना मोबाईल, पेजर, ब्लूटूथ, वायफाय डिव्हाईस,डिजिटल कॅमेरा, स्मार्ट वॉच, इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस व डिजिटल डिव्हाईस इत्यादी नेण्यास मनाई केली आहे.

ही परीक्षा वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज न्ड रिसर्च, भारती विद्यापीठ जवळ, सांगली-मिरज रोड, वान्लेसवाडी सांगली या परीक्षा केंद्रावर दि. ७ ते ८ ऑक्टोबर २०२३ व १० ते ११ ऑक्टोबर २०२३ या दिवशी व टेकवेअर टेक्नोलॉजी विठ्ठल पाटील पॉलीटेक्निक इनामधामणी, सांगली या परीक्षा केंद्रावर दि. ११ ऑक्टोबर २०२३ या दिवशी सकाळी ६ ते सायंकाळी ८ या वेळेत घेण्यात येणार आहे. हा आदेश कायदेशिर कर्तव्य बजावित असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना व धार्मिक विधी यांना लागू राहणार नाही, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी जारी केले आहेत.

# महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** पुणे विभागीय स्तरावरील विभागीय महिला लोकशाही दिन सोमवार, दिनांक ९ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालय, विधान भवन, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती महिला व बाल विकास पुणे विभागाचे विभागीय उप आयुक्त तथा सदस्य सचिव संजय माने यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली आहे.

समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण होवून त्यांना न्याय मिळावा या दृष्टीने महिलांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी तसेच या महिलांना सुलभ मार्गदर्शन व्हावे यासाठी प्रभावी उपाययोजना म्हणून विभागीय स्तरावर महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय कार्यालयात आयोजित करण्यात येतो. महिला लोकशाही दिनी महिलांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारी, अडचणी यावर संबंधित विभागाचे अहवाल, त्याबद्दलचे नियम, शासनाची भूमिका यांचा विचार करुन महिला लोकशाही दिनानंतर कमाल एक महिन्याच्या आत अर्जदाराला उत्तर देण्याची तरतूद शासन निर्णयात केली आहे.

महिला लोकशाही दिनासाठी तक्रार व अडचणी अर्ज देण्याकरीता अर्ज विहित नमुन्यात असावा. तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे. तक्रार अर्ज २ प्रतीत असावा. महिला लोकशाही दिनामध्ये न्याय प्रविष्ठ प्रकरणे, विहीत नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवा विषयक व आस्थापनाविषयक बाबी, तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

महिला लोकशाही दिनासाठी प्राप्त होणारे तक्रार अर्ज स्विकारल्यानंतर ज्या विभागाशी संबंधित तक्रार आहे त्या विभाग प्रमुखाकडे तक्रार अर्ज पाठविण्यात येणार असून संबंधित विभाग प्रमुख हे तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह महिला लोकशाही दिनी उपस्थित राहणार आहेत. अर्जदारास महिला लोकशाही दिनानंतर कमाल एक महिन्याच्या आत अंतिम उत्तर दिले जाणार आहे. कोणत्याही परिस्थितीत विहित नमुन्यात अर्ज नसल्यास असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. पुणे विभागीय स्तरावरील महिला लोकशाही दिनासाठीचे तक्रार, निवेदन अर्ज विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास पुणे विभाग पुणे, पोलीस आयुक्तालय शेजारी, ३ चर्च रोड पुणे ४११००१ या पत्यावर स्वीकारण्यात येणार आहेत, असे विभागीय उप आयुक्त संजय माने यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# कोल्हापूरच्या शेंडापार्क येथील आयटी पार्कसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाची ३० हेक्टर जागा - उपमुख्यमंत्री अजित पवार



**मुंबई :** कोल्हापुरात संगणक, माहिती तंत्रज्ञान उद्योगांची वाढ व्हावी, स्थानिक युवकांना रोजगार मिळावा यासाठी शेंडापार्क परिसरात आयटी पार्क उभारण्यात यावे. शेंडापार्क येथील आयटी पार्कसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाची ३० हेक्टर जागा उपलब्ध करून द्यावी. या जागेच्या बदल्यात कृषी विद्यापीठास त्यांच्या विविध प्रकल्पांसाठी शहरालगतची ५० हेक्टर जागा द्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात कोल्हापूरच्या शेंडापार्क परिसरात आयटी पार्क उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत बैठक झाली. बैठकीस वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ, कृषी मंत्री धनंजय मुंडे, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आमदार ऋतुराज पाटील, आमदार जयश्री जाधव, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितिन करीर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी राहुल रेखावार (व्हीसीद्वारे), एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी बिपीन शर्मा (व्हीसीद्वारे) आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, कोल्हापूरची वाढती लोकसंख्या आणि शहरीकरणाचा वेग लक्षात घेता येथील विद्यार्थी, युवकांना स्थानिक परिसरात रोजगार उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्यासाठी शहरातील शेंडा पार्क येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाची ३० हेक्टर जागा आयटी पार्क साठी उपलब्ध करुन द्यावी. यामुळे विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाच्या आणि तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. आयटी पार्कसाठी कृषी विद्यापीठाची मोकळी ३० हेक्टर जागा देताना, विद्यापीठाला पर्यायी ५० हेक्टर जागा उपलब्ध करून द्यावी. शहरातील या क्षेत्रापासून विमानतळ आणि पुरेशा नागरी सुविधा उपलब्ध असल्याने आंतरराष्ट्रीय कंपन्यांची गुंतवणूक वाढण्यास मदत होणार आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांना पुण्यानंतर कोल्हापूर हा चांगला पर्याय आहे. आयटी पार्कची उभारणी निश्चित कालमर्यादेत करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. कोल्हापूर शहरात असलेले शासकीय आयटीपार्क पूर्ण क्षमतेने सुरू करण्याच्या प्रक्रियेस गती द्यावी, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# महिला घरेलू कामगारांच्या प्रश्नावर राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल - महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे



**मुंबई :** महिला घरेलू कामगारांची नोंदणी करणे, वेतन विषयक विविध प्रश्न, जनश्री विमा योजना लागू करणे या विविध प्रश्नांसाठी कामगार विभाग यांच्या समन्वयातून महिला घरेलू कामगारांच्या प्रश्नावर शासन सकारात्मक निर्णय घेईल, असे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य घरेलु कामगार समन्वय समितीची बैठक आज मंत्रालयात आयोजित केली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या. मंत्री कु. तटकरे म्हणाल्या की, उच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्णयानुसार मंडळाच्या त्रिपक्षीय मंडळाची स्थापना करणे, किमान वेतन, घरेलू महिला कामगारांना जनश्री विमा योजना लागू करणे, ५५ वर्षांवरील महिला घरेलू कामगारांचे वेतनविषयक इतर प्रश्नांबाबत कामगार विभागाशी चर्चा करून याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल.

यावेळी राष्ट्रीय घरेलू कामगार चळवळ, महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघ, कामगार एकता युनियन, विदर्भ मोलकरीण संघटना, महाराष्ट्र महिला परिषद, महामाया समाज विकास ट्रस्ट, जनकल्याण सोशल फाऊंडेशन, सावित्रीबाई फुले घरेलू कामगार संघटन, सीएफटीयूआय, महाराष्ट्र घरकामगार विकास संघटन, घर हक्क संघर्ष समिती, कष्टकरी घरकामगार संघटना, निर्माण मजदूर, श्रमजिवी संघटना, विश्वशांती महिला विकास मंडळ, आनंद आधार घरेलु कामगार संघटना, श्रमिक किमयागार संघटना, महाराष्ट्र फेरीवाला महासंघ, महाराष्ट्र असंघटित कामगार संघटना, घर कामगार मोलकरीण संगठना, कष्टकरी संघर्ष महासंग, सर्व श्रमिक संघटना, ओएचएससी, मोलकरीण घरेलू कामगार संघ, गृहकार्य सेवा श्रमिक संघटना, महाराष्ट्र राज्य घरेलू कामगार संघटना, महाराष्ट्र कष्टकरी घरकामगार संघटना, मोलकरीण पंचायत, श्रमजीवी संघटना, घरकुल संघर्ष समिती, एआटीयूसी, सुराज्य श्रमिक सेना, भाकर फाऊंडेशनचे सदस्य उपस्थित होते.










# शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'आयटी' उपक्रम प्रभावीपणे राबवावा - कृषिमंत्री धनंजय मुंडे



**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट पोहोचवण्याच्या प्रक्रियेत माहिती तंत्रज्ञान विभागाचा वाटा लक्षणीय असून शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत लाभ पोहोचवण्यासाठी कृषी आणि माहिती तंत्रज्ञान विभागाने समन्वयाने काम करावे, अशा सूचना कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी केल्या.

कृषी विभागामार्फत कार्यान्वित आयटी उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या (महा आयटी) व्यवस्थापकीय संचालक जयश्री भोज, कृषी विभागाच्या सहसचिव सरिता बांदेकर, फलोत्पादन विभागाचे संचालक कैलास मोते यांची उपस्थिती होती.

कृषी विभागाच्या विविध २७ योजना महाडीबीटी पोर्टलमार्फत सुरू असून आतापर्यंत ३४ लाख शेतकऱ्यांनी नोंदणी करून विविध योजनांसाठी एक कोटी दोन लाख अर्ज केले आहेत. या माध्यमातून शासनाकडे शेतकऱ्यांची व त्यांच्या जमीन आणि पीक प्रक्रियेची माहिती संकलित झाली आहे.

कृषी विभागाच्या महाडीबीटी पोर्टल, महाकृषी मोबाईल प्लिकेशन व वेब पोर्टल, क्रॉपसॅप, क्रॉपवॉच, कृषी निविष्ठा विक्री परवाना वितरण कार्यप्रणाली, फार्मर डेटाबेस, महाग्रीटेक, पर्जन्यमापन आणि विश्लेषण, ई-ठिबक, ई- सॉईल ३.००, नमो शेतकरी महा सन्मान निधी या योजनेअंतर्गत सुरू असलेला तांत्रिक प्रक्रियेचा आढावा यावेळी कृषी मंत्री श्री. मुंडे यांनी घेतला. तसेच प्राप्त अर्जांच्या तुलनेत लाभार्थींची संख्या वाढवण्याची महत्त्वपूर्ण सूचना कृषी विभागाला केली.

शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या लाभांची प्राथमिकता ठरविण्यात यावी. तांत्रिक बाबतीत सुधारणा करण्यात यावी, प्रथम येणाऱ्या अर्जाला प्रथम प्राधान्य देण्यात यावे. संपूर्ण पूर्तता करून आलेले सर्व अर्ज मंजूर करून उपलब्ध निधीनुसार लाभ देण्यात यावा. लॉटरी पद्धत बंद करण्याबाबत तातडीने कार्यवाही व्हावी, शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी सुधारित एसओपी तयार करण्यात यावी, अशा सूचना मंत्री श्री. मुंडे यांनी दिल्या.

# तर आम्ही सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना 'कायमस्वरूपी' करू : प्रकाश आंबेडकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सरकारी यंत्रणेत पूर्वीच्या काळाप्रमाणे चातुर्वर्ण व्यवस्था राबवली जात असल्याचा गंभीर आरोप केला आहे. तसेच सद्यस्थितीत वर्ग तीन व वर्ग चारचे कर्मचारी नव्या चातुर्वर्णातील शूद्र-अतिशूद्र आहेत, असंही म्हणत सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमसेवेत घेण्याचं आश्वासन दिलं. ते गुरुवारी (५ ऑक्टोबर) मुंबईतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.
प्रकाश आंबेडकर म्हणाले, पूर्वीच्या काळात असलेली चातुर्वर्ण व्यवस्था याही काळात सरकारी यंत्रणेत राबवली जात असल्याचं



मुंबई : येथील पत्रकार परिषदेमध्ये बोलताना प्रकाश आंबेडकर व उपस्थित मान्यवर

दिसून येत आहे. पूर्वी जसं चातुर्वर्णातील सर्वात खालच्या वर्णाला, शूद्र अतिशूद्र यांना (दलित, आदिवासी, ओबीसी) कुठलीही सामाजिक आर्थिक सुरक्षितता देण्यात येत नव्हती, त्याच पद्धतीने आता सरकार वर्ग तीन आणि वर्ग चारची पद ही कंत्राटी पद्धतीने भरून या वर्ग तीन व वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांना असुरक्षिततेत ढकलत आहे. एक प्रकारे त्यांना चातुर्ण्यातली शूद्र - अतिशूद्र यांच्या प्रमाणे हीन वागणूक देण्याचा प्रकार सरकारकडून होत आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांनी इतकी वर्ष काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची राजवट बघितली. त्यानंतर शिवसेना आणि भाजपाची राजवट बघितली. आता शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट आणि भाजपा यांची राजवट बघत आहेत. मात्र या धोरणात काही बदल झाल्याचे दिसून येत नाही. सध्याच्या शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकारने तर ९ खासगी कंपन्या कंत्राटी भरतीसाठी नेमल्या आहेत, असा आरोप प्रकाश आंबेडकर यांनी केला.
प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले, ४ हजार ६४४ ग्रामसेवकपदाची भरती निघाली. त्यासाठी ११ लाख ५० हजार उमेदवारांनी अर्ज भरले. प्रत्येक उमेदवाराकडून टीसीआय कंपनीने १००० रुपये शुल्क घेतले. या सगळ्या व्यवहारातून टीसीआय कंपनीला १२० कोटी रुपयांचा फायदा झाला. आता या १२० कोटी रुपयांमध्ये कोणा कोणाचा किती वाटा आहे हे त्यांनी जाहीर करावे. विद्यार्थ्यांची, बेरोजगार तरुणांची ही लूट आहे. सरकारने तत्काळ ही लूट थांबवली पाहिजे.

# बांधकाम कामगारांनी काम करताना सुरक्षा किट वापरण्याची दक्षता घ्यावी

### डॉ. सुरेश खाडे : नोंदित बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक वस्तू संच वाटप

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**सांगली :** कामगारांना वाटप करण्यात आलेले सुरक्षा किट हे कामगारांच्या जीवनाला संरक्षण देणारे कवच आहे. यासाठी काम करताना सुरक्षा किट वापरण्याची कामगारांनी दक्षता घ्यावी. महाराष्ट्रात ७३ हजार किट कामगारांना वाटप करणार असल्याचे प्रतिपादन कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी केले.
मिरज येथे नोंदित बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक वस्तू संच वाटप मेळाव्यात ते बोलत होते. बालगंधर्व नाट्य मंदिर येथे आयोजित या कार्यक्रमास खासदार संजय पाटील, माजी मंत्री आमदार चंद्रशेखर बावनकुळे, माजी महापौर संगीता खोत, सहायक आयुक्त कामगार कल्याण एम. ए. मुजावर आदि उपस्थित होते.
यावेळी माजी मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, बांधकाम कामगारांसाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. प्रत्येक तालुक्यात सेतू केंद्र करण्याचा निर्णय घेतला असून त्यामुळे कामगारांना त्यांच्या तालुक्याच्या ठिकाणीच नोंदणी करता येणार आहे. संघटित व असंघटित कामगारांना एक वर्षाऐवजी पाच वर्षासाठी कार्ड देवून त्यांना न्याय द्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.
यावेळी पालकमंत्री डॉ. खाडे यांच्या व अन्य मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ अंतर्गत बांधकाम कामगारांना अर्थ सहाय्य वितरित करण्यात आले. यामध्ये नैसर्गिक मृत्यू झालेल्या नोंदणीकृत बांधकाम कामगाराच्या वारसास, वैद्यकीय व अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या पाल्याना अर्थ सहाय्य, विवाह खर्चाची प्रतिपूर्ती, शैक्षणिक सामुग्रीसाठी, तसेच कामगाराच्या पत्नीच्या प्रसूतीसाठी अर्थसहाय्य यांचा समावेश आहे. तसेच अटल बांधकाम कामगारांसाठी आवास योजना अंतर्गत प्रातिनिधिक स्वरूपात घरकुलाची प्रतिकृती देण्यात आली.

# एफटीआयआयच्या अध्यक्षपदाची सूत्रे आर. माधवन यांनी स्वीकारली

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**पुणे :** राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या (एफटीआयआय) अध्यक्षपदी नियुक्ती झालेले अभिनेते आर. माधवन यांनी पदाची सूत्रे स्वीकारली.


पुणे : एफटीआयआयच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्विकारताना आर. माधवन

राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या (एफटीआयआय) अध्यक्षपदी नियुक्ती झालेले अभिनेते आर. माधवन यांनी पदाची सूत्रे स्वीकारली. तसेच विद्यार्थी, संस्थेतील विविध विभागांचे प्रमुख, शिक्षक आणि कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशभरात आदिवासींसह विविध समाजघटकांसाठी विनामूल्य लघु अभ्यासक्रम राबवण्याची त्यांनी इच्छा व्यक्त केली.
आर. माधवन अभिनेता म्हणून तमीळ, तेलुगू, कन्नड, हिंदी चित्रपसृष्टीत दीर्घकाळ कार्यरत आहेत. शास्त्रज्ञ नंबी नारायण यांच्या जीवनावर आधारित 'रॉकेट्री' या चित्रपटासाठी नुकताच त्यांना राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. त्यांची एफटीआयआयच्या अध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली. या पार्श्वभूमीवर माधवन यांनी दोन दिवसांच्या दौऱ्यात संस्था, कामकाज, अभ्यासक्रमा, सोयीसुविधांचा आढावा घेतला. नियामक परिषद, विद्या परिषद, स्थायी वित्त समितीचे अध्यक्ष म्हणून बैठका घेतल्या. त्यात त्यांनी अभ्यासक्रमांची रचना समजून घेण्यासाठी चित्रपट आणि दूरचित्रवाणी विभागाच्या प्रमुखांशी संवाद साधला. तर विद्यार्थ्यांच्या अपेक्षाही जाणून घेतल्या. संस्थेत उपलब्ध असलेल्या सुविधांचे, तसेच मुक्त शिक्षण केंद्राच्या माध्यमातून देशभरात राबवलेल्या लघु अभ्यासक्रमांचे कौतुक केले. चित्रपटसृष्टीत काम करण्यासाठी लहान मुलांसारखा उत्साह टिकवून ठेवण्याची आवश्यकता आहे. कारण उत्साहच सर्जनशीलता आणि उत्कृष्टतेसाठीची प्रेरक शक्ती असल्याचे मत माधवन यांनी मांडले.

# रवींद्र- कॉनवेची वादळी शतके !

## न्यूझीलंडने इंग्लंडचा नऊ विकेट्सने केला पराभव

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**अहमदाबाद :** विश्वचषक स्पर्धेतील पहिल्या सामन्यात न्यूझीलंडने विजेतेपदाचा प्रबळ दावेदार मानल्या जाणाऱ्या गतविजेत्या इंग्लंडचा नऊ गडी राखून पराभव केला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुरुवारी (५ ऑक्टोबर) न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडने ५० षटकांत नऊ गडी गमावून २८२ धावा केल्या. न्यूझीलंडने ३६.२ षटकात १ विकेट गमावत २८३ धावा करत सामना जिंकला.
न्यूझीलंड संघाने १३ व्या विश्वचषकाची धमाकेदार सुरुवात केली आहे. त्यांनी गतविजेत्या इंग्लंडचा नऊ गडी राखून पराभव केला. या विजयासह किवी संघाने विश्वचषक २०१९च्या अंतिम फेरीतील पराभवाचा बदला घेतला. त्यानंतर विजेतेपदाच्या सामन्यात सामना आणि सुपर ओव्हर बरोबरीत सुटल्यानंतर इंग्लंडने चौकार मोजण्याच्या नियमानुसार सामना जिंकला. बादच्या नरेंद्र मोदी स्टेडियम वर गुरुवारी अहमदा (५ ऑक्टोबर) न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडने ५० षटकांत नऊ गडी गमावून २८२ धावा केल्या. न्यूझीलंडने ३६.२ षटकात १ विकेट गमावत २८३ धावा करत सामना जिंकला.






अहमदाबाद : न्युझीलंडच्या विजयाचे शिल्पकार शतकवीर रचिन रवींद्र तर दीडशतकवीर डेव्हॉन कॉनवे

न्यूझीलंडचा सलामीवीर डेव्हॉन कॉनवे आणि तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला रचिन रवींद्र यांनी कमाल केली. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी २७३ धावांची नाबाद भागीदारी केली. कॉनवेने १२१ चेंडूत नाबाद १५२ धावा केल्या. रचिनने ९६ चेंडूत १२३ धावा केल्या. कॉनवेने आपल्या खेळीत १९ चौकार आणि तीन षटकार मारले. तर रचिनने ११ चौकार आणि पाच षटकार मारले. दोघांच्या आक्रमक फलंदाजीसमोर इंग्लंडचे गोलंदाज हतबल दिसत होते. इंग्लंडकडून फक्त सॅम करनने एक विकेट घेतली. रचिनला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.
नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या इंग्लंड संघाने ५० षटकांत नऊ गडी गमावून २८२ धावा केल्या. इंग्लंडचा अनुभवी फलंदाज जो रूटने सर्वाधिक ७७ धावा केल्या. त्याच्याशिवाय इतर कोणत्याही फलंदाजाला ५० धावांचा टप्पा गाठता आला नाही. कर्णधार जोस बटलरने ४३ धावा केल्या. जॉनी बेअरस्टोने ३३, हॅरी ब्रूकने २५ आणि लियाम लिव्हिंगस्टोनने २० धावांचे योगदान दिले. आदिल रशीदने नाबाद १५, डेव्हिड मलान आणि सॅम करनने १४-१४, मार्क वुडने नाबाद १३, मोईन अली आणि ख्रिस वोक्सने ११-११ धावा केल्या.
या सामन्यात न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी इंग्लंडच्या स्फोटक फलंदाजांना मुक्तपणे खेळू दिले नाही. वेगवान आणि फिरकीच्या मिश्रणाने इंग्लिश संघाला खूप त्रास दिला. वेगवान गोलंदाज मॅट हेन्रीने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. फिरकीपटू मिचेल सँटनर आणि ग्लेन फिलिप्स यांना प्रत्येकी दोन यश मिळाले. ट्रेंट बोल्ट आणि रचिन रवींद्र यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.